ई - साहित्य प्रकाशन
वर्ष : दूसरे, अंक : ९
दिनांक : २२.०२.२०१०



प्रेम....
कुणावर करावं ?
कुणावरही करावं..
कारण,
प्रेम आहे माणसाच्या संस्कृतीचा सारांश
त्याच्या इतिहासाचा निष्कर्ष
आणि भविष्यकालातील त्याच्या अभ्युदयाची आशा....एकमेव !



## या अंकात वाचा..

### मराठी राज्यभाषा दिनानिमित्त
### कुसुमाग्रजांच्या कवितांची कुसुमावली

**संपादक -**
स्वप्ना कोल्हे ( नाशिक )

**सहसंपादक -**
सोनाली घाटपांडे ( पुणे )
भारती सरमळकर ( मुंबई )
सचिन काकडे ( मुंबई )

**अतिथी संपादक -**
प्राजक्त देशमुख ( नाशिक )

हा विनामूल्य अंक नियमित मिळण्यासाठी तसेच सूचना,अभिप्राय,प्रतिक्रियांसाठी.. netaksharee@gmail.com

## ....कागद....

जाणत्या जीवनात सर्वाधिक शोध घेतला
तो कोऱ्या कागदाचा ,वर्षानुवर्षे.. वर्षानुवर्षे
जेथे गेलो तेथे । कागदाचा संग
अस्मितेचे रंग । टिपावया
प्राणांतिक प्रयत्न
सुचलेलं साचलेलं ,जाणवलेलं जाळणारं
त्यावर उमटवण्याचा
आशेतील आकाश,सत्यातील जमीन
त्यावर नोंदवण्याचा
मातीच्या मागण्या , नक्षत्रांचे आदेश
कोऱ्यावर कोरण्याचा
कागदच झाले । जीवाचे आधार
नौकेला बंदर । विश्रांतीस
त्यांनीच खोवले । मंदिरात तुरे
निंदेचे निखारे । तेही त्यांचे
कीर्तीचेही रस्ते । कागदामधून
शून्याला सांत्वन । कागदांचे
असे कागदांचे । माझ्यावरी ऋण
जगण्याचा सण । केला त्यांनी
असे असूनही
आज ते कागदांचे रस्ते
काळे झगे पेहरुन , रांग करुन
माझ्या दारावरुन
चालले आहेत अल्विदा करीत
घोगऱ्या स्वरात गाणे गात
महाठका,ठकवलेस आम्हा
दिलीस दिवटी दावून तारा
बांधलेस शब्दांचे ताबूत
अर्थ मनात दडवूनी सारा
सायोनारा....सायोनारा

# संपादकीय

कुसुमाग्रज हे लिहणाऱ्यांचे दैवत.आणि म्हणूनच २७ फेब्रुवारी हा त्यांचा जन्मदिन 'मराठी राज्यभाषा दिन' म्हणून साजरा केला जातो.तसं पाहिलं तर मराठी साहित्यात अनेक वैशिष्ट्यपूर्ण कवी,नाटककार,लेखक होऊन गेलेत पण कुसुमाग्रजांचे स्थान मात्र ध्रुव ताऱ्याइतके अढळ आहे आणि म्हणूनच १९९२ साली आंतरराष्ट्रीय स्टार सोसायटी ऑफ अमेरिकेने एका नक्षत्राला त्यांचे नावही दिले आहे.

जवळपास गेली ७० वर्षे मराठी मनाला भारावून टाकणारे कुसुमाग्रज त्यांच्या शब्दांतून अमर झालेले आहेत.कविता,चित्रपटगीतं,नाटकं,एकांकिका,कथा,कादंबरी असे विविध आविष्कार त्यांच्या लेखणीतून प्रकट झालेले आहेत.आपल्या कालखंडातील सामाजिक,राजकीय परिस्थिती वर्णन करत कालखंडाची चौकट भेदून तोच आशय सार्वकालिकही करायचा हे अवघड कार्य त्यांनी लीलया आपल्या साहित्यातून केले आहे.त्यांनी विशिष्ट समस्येच्या तळाशी असलेल्या शाश्वत भावनेचा,व्यापक जीवनाशी असलेल्या तिच्या नात्याचा शोध घेऊन प्रतीकात्मक पातळीवर अनेक कवितांची उभारणी केली.त्यामुळे काळाशी जखडून ठेवणाऱ्या पेचातून त्यांची कविता सुटली आहे.सर्वांगीण सामाजिक क्रांती,राजकीय घडामोडी आणि सांस्कृतिक स्वातंत्र्य यांच्या विस्तृत संदर्भाकडे पाठ न फिरवता वैयक्तिक सुखदुःखांची अतिशय हळुवार जोपासना करु पाहणाऱ्या तरुण मनाची त्यांची कविता स्वतंत्र भारताची प्रातिनिधीक कविता आहे.त्यांच्या कवितेची दखल इतर भाषिक जनमानसानेही घेतली आणि त्यांच्या कवितांची भाषांतरेही झालीत.

फक्त काव्यनिर्मिती पर्यंत मर्यादित न राहता त्यांनी अनेक दर्जेदार नाटकं,कथा,कादंबरीही लिहील्यात.संवेदनशील मनाचे कुसुमाग्रज युवावस्थेपासूनच सामाजिक कार्यातही सक्रिय होते.आदिवासींविषयी त्यांना विशेष आपुलकी होती.त्यांच्या ह्या तळमळीतूनच १९९० साली नाशिक येथे कुसुमाग्रज प्रतिष्ठानची स्थापना करण्यात आली.प्रतिष्ठानच्या माध्यमातून अनेक दैदिप्यमान असे सामाजिक,सांस्कृतिक उपक्रम राबवण्यात येतात.विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी पुरस्कार दिले जातात.

सामाजिक,साहित्यिक क्षेत्रातील त्यांच्या कार्याची दखल घेत ते विविध पुरस्कारांचे मानकरीही ठरले.पुणे विद्यापिठाने त्यांना डी.लिट ही मानाची पदवी देऊन सन्मानित केलेले आहे.तसेच ज्ञानपीठ ह्या उच्च पुरस्काराचेही ते मानकरी ठरलेले आहेत.

ज्याप्रमाणे सागराला त्याच्याच ओंजळभर पाण्याचे अर्घ्य दिले जाते त्याप्रमाणे त्यांच्याच कवितांची कुसुमांजली ह्या अंकामधून आम्ही देत आहोत.

- स्वप्ना कोल्हे ( नाशिक )
संपादक

# अतिथी संपादकाच्या लेखणीतून

कुसुमाग्रजांबद्दल कुणी कितीही लिहलं तरीही वाचणाऱ्याला मात्र ते कमीच वाटेल.त्यांचे शब्दं हेच त्यांची ओळख आहे आणि एक कवी,लेखक ह्यापलीकडेही एक संवेदनशील आणि सामाजिक कार्याची आवड असलेला एक निर्मळ मनुष्य हीदेखील त्यांची ओळख आहे.

आजकाल साहित्य संमेलनाच्या अध्यक्षांच्या निवडीवरुन होणारे वादळ जुने होत असतांना एक काळ असा होता जेव्हा स्वतः संमेलनाध्यक्ष प्रकृती अस्वास्थ्यामुळे संमेलनातून गैरहजर होते आणि अचानक खच्चुन भरलेलं,ऐन रंगात आलेलं सबंध संमेलन उठून उभं राहिलं आणि टाळ्या वाजवू लागलं.कारण,संमेलनात मधोमध व्हिलचेअर वरुन हसत हसत स्वतः ते येत होते..कुसुमाग्रज..

अशा अनेक प्रसंगातून त्यांची मराठी भाषेवरील भक्ति आणि साहित्याची तपस्या दिसून आलेली आहे.मराठी भाषेत नवीन शब्द येण्यांसाठी ‘मला शब्दं द्या’ म्हणत ते याचक देखील झाले होते.कुसुमाग्रज हे मराठी भाषेला पडलेलं स्वप्न नव्हे तर अत्यंत जाज्वल्य वास्तव आहे.असं वास्तव जे त्यांनाही ठायी ठायी दिसलं,कित्येक साध्या साध्या गोष्टींमध्ये.कधी रस्त्याच्या चौकात,कधी पुतळ्यात,कधी झाडात,कधी सरकारी भिंतीवर,कधी खेचलेल्या बाणावर,कधी साध्या चमच्यात तर कधी रद्दीमध्ये सुध्दा.

प्रसिध्द हिंदी कवी गुलजार ह्यांनी कुसुमाग्रजांच्या काही कविता हिंदीत अनुवादित केल्या आहेत.कुसुमाग्रजांविषयी ते म्हणतात,कुसुमाग्रजजी में मुझे उनकी सादा बयानी सबसे ज्यादा भा गई.उनकी लिखावट और सोच उन्हें गालिबके करीब लाती है.

कुसुमाग्रजांच्या कविता मला शाळेतच वाचायला मिळाल्या आणि तेव्हापासून माझ्या मराठी कण्यापासून मनापर्यंत संस्कार होत गेले..होत आहेत..होत राहतील..

- प्राजक्त देशमुख ( नाशिक )
अतिथी संपादक



**ह्या** अंकाचा अतिथी संपादक प्राजक्त देशमुख अभिनेता, दिग्दर्शक, प्रकाशयोजनाकार,ललितलेखक अशा बहुरंगी भूमिकात यशस्वीरीत्या कार्यरत असून तो अश्वमेध थिएटर्स,नाशिक ह्या संस्थेमधून रंगभूमीची सेवा देखील करत आहे.ह्याच वर्षी प्रदर्शित झालेल्या ‘यज्ञ’ ह्या मराठी चित्रपटात त्याने अभिनय व दिग्दर्शन केलले आहे.मागील वर्षी झालेल्या पु.ल.महाकरंडक स्पर्धेचा तो विजेता देखील आहे.

## ....मौन....

शिणलेल्या झाडापाशी कोकिळा आली
म्हणाली,गाणं गाऊ का ?
झाड बोलल नाही,कोकिळा उडून गेली
शिणलेल्या झाडापाशी सुगरण आली
म्हणाली,घरटं बांधू का ?
झाड बोललं नाही,सुगरण निघून गेली
शिणलेल्या झाडापाशी चंद्रकोर आली
म्हणाली,जाळीत लपू का ?
झाड बोललं नाही,चंद्रकोर मार्गस्थ झाली
शिणलेल्या झाडापाशी बिजली आली
म्हणाली,मिठीत येऊ का ?
झाडाचं मौन सुटलं
अंगांअंगातून होकारांच तुफान उठलं

**....कुसुमाग्रज....**

तू शब्दंजोगी
वृत्तयोगी
छंदबंदी वीर तू
तू गद्यवेडा
अलंकृत अन
मुक्तछंदी पीर तू
ह्या तुझ्या छंदात
मी बध्दही अन मुक्तही
ह्या तुझ्या शब्दांत
मी नेमही अन ठारही

- प्राजक्त देशमुख ( नाशिक )

# कुसुमावली



## ....वेडात मराठे वीर दौडले सात....

श्रुति धन्य जाहल्या श्रवुनि आपुली वार्ता
रण सोडुनि सेनासागर अमुचे पळता
अबलाहि घरोघर खऱ्या लाजतिल आता
भरदिवसा आम्हा दिसू लागली रात
वेडात मराठे वीर दौडले सात !

ते कठोर अक्षर एक एक त्यातील
जाळीत चालले कणखर ताठर दील
माघारी वळणे नाही मराठी शील
विसरला महाशय काय लाविता जात ?
वेडात मराठे वीर दौडले सात !

वर भिवई चढली दात दाबती ओठ
छातीवर तुटली पटबंदाची गाठ
डोळ्यांत उठे काहूर ओलावे काठ
म्यानातुन उसळे तलवारीची पात
वेडात मराठे वीर दौडले सात !

जरि काल दाविली प्रभु,गनिमांना पाठ
जरि काळ विसरलो जरा मराठी जात
हा असा धावतो आज अरी शिबीरात
तव मानकरी हा घेऊनि शीर करात
वेडात मराठे वीर दौडले सात !

ते फिरता बाजूस डोळे किंचित ओले
सरदार सहा सरसावनि उठले शेले

आश्चर्यमुग्ध टाकून मागुती सेना
अपमान बुजविण्या सात अर्पुनी माना
छावणीत शिरले थेट,भेट गनिमांना
कोसळल्या उल्का जळत सात दर्यात
वेडात मराठे वीर दौडले सात !

खालून आग,वर आग,आग बाजूंनी
समशेर उसळली सहस्त्र क्रुर इमानी
गर्दीत लोपले सात जीव ते मानी
खग सात जळाले अभिमानी वणव्यात
वेडात मराठे वीर दौडले सात !

दगडांवर दिसतील अजुनि तेथल्या टाचा
ओढ्यात तरंगे अजुनी रंग रक्ताचा
क्षितीजावर उठतो अजुनी मेघ मातीचा
अद्याप विराणी कुणी वाऱ्यावर गात
वेडात मराठे वीर दौडले सात !



....प्रेम कर भिल्लासारखं....

पुरे झाले चंद्र सूर्य,पुरे झाल्या तारा
पुरे झाले नदीनाले,पुरे झाला वारा

मोरासारखा छाती काढून उभा राहा
जाळासारखा नजरेत नजर बांधून पाहा
सांग तिला..
तुझ्या मिठीत स्वर्ग आहे सारा

शेवाळलेले शब्दं आणिक यमक छंद करतील काय ?
डांबरी सडकेवर श्रावण इंद्रधनु बांधील काय ?
उन्हाळयातल्या ढगासारखा हवेत बसशील फिरत
जास्तीत जास्त १२ महिने बाई बसेल झुरत
नंतर तुला लगीन चिठ्ठी आल्याशिवाय राहील काय ?

म्हणून म्हणतो,जागा हो जाण्यापूर्वी वेळ
प्रेम नाही अक्षरांच्या भातुकलीचा खेळ

प्रेम म्हणजे वणवा होऊन जाळत जाणं
प्रेम म्हणजे जंगल होऊन जळत राहणं

प्रेम कर भिल्लासारखं,बाणावरती खोचलेलं
मातीमध्ये उगवून सुध्दा मेघापर्यंत पोहचलेलं

शब्दांच्या या धुक्यामध्ये अडकू नकोस
बुरुजावरती झेंड्यासारखा फडकू नकोस

उधळून दे तुफान सारं मनामध्ये साचलेलं
प्रेम कर भिल्लासारखं,बाणावरती खोचलेलं



....अखेर कमाई....

मध्यरात्र उलटल्यावर
शहरातील पाच पुतळे
एका चौथऱ्यावर बसले

आणि टिपं गाळू लागले

ज्योतिबा म्हणाले,शेवटी मी झालो फक्त माळयांचा

शिवाजीराजे म्हणाले,मी फक्त मराठ्यांचा

आंबेडकर म्हणाले,मी फक्त बौध्दांचा

टिळक उद्‌गारले,मी तर फक्त चित्पावन ब्राम्हणांचा

गांधींनी गळयातला गहिवर आवरला
आणि ते म्हणाले,
तरी तुम्ही भाग्यवान
एकेक जातजमात तरी तुमच्या पाठीशी आहे

माझ्या पाठीशी मात्र फक्त सरकारी कचेऱ्यातील भिंती !



....कणा....

ओळखलंत का सर मला ? पावसात आला कोणी
कपडे होते कर्दमलेले,केसांवरती पाणी

क्षणभर बसला नंतर हसला बोलला वरती पाहून
गंगामाई पाहुणी आली,गेली घरट्यात राहून
माहेरवाशिणीसारखी चार भिंतीत नाचली

मोकळ्या हाती जाईल कशी,बायको मात्र वाचली
भिंत खचली,चूल विझली,होते नव्हते नेले
प्रसाद म्हणून पापण्यांवरती पाणी थोडे ठेवले

खिशाकडे हात जाताच हसत हसत उठला
पैसे नकोत सर जरा एकटेपणा वाटला

कारभारणीला घेऊन संगे सर आता लढतो आहे
पडकी भिंत बांधतो आहे,चिखलगाळ काढतो आहे

मोडून पडला संसार तरी मोडला नाही कणा
पाठीवरती हात ठेऊन तुम्ही फक्त लढ म्हणा



....केक....

हॉटेलच्या गच्चीवरुन त्यानं फेकला दर्याद्रतेनं चॉकलेट केकचा

भला मोठा तुकडा
रस्त्यावरील कुत्र्यासाठी

कुत्रा धावत सुटला
आणि हॉटेलच्या सावलीला उभा असलेला
कळकट चिंध्यातील एक आगंतुक मुलगाही

मुलगा प्राणपणानं धावला
कुत्र्याच्या वेगावर मात करुन
त्यानं काबीज केला
तो तुकडा आणि
कुत्र्याला वाव राहू नये म्हणून
तोंडात कोंबलाही
असभ्य घाईनं

गच्चीवरील दर्याद्र दाता
शिवास रीगलचा पेला
ओठाला लावत ओरडला

ही हलकट कार्टी !

....गाभारा....



दर्शनाला आलात ? या..
पण या देवालयात सध्या देव नाही
गाभारा आहे,चांदीचे मखर आहे
सोन्याच्या समया आहेत,हिऱ्यांची झालर आहे
त्यांचही दर्शन घ्यायला हरकत नाही
वाजवा ती घंटा आणि असे इकडे या
पाहिलात ना तो रिकामा गाभारा?
नाही तसं नाही,एकदा होता तो तिथे
काकड आरतीला उठायचा,शेजारतीला झोपायचा
दरवाजे बंद करुन बरोबर बाराला जेवायचा
दोन तास वामकुक्षी घ्यायचा
सारं काही ठीक चाललं होतं
रुपयांच्या राशी,माणिक मोत्यांचे ढीग
पडत होते पायाशी
दक्षिण दरवाज्याजवळ मोटारीचे भोंगे वाजत होते
मंत्रजागर गाजत होते
रेशीम साड्या,टेरीनचे सूट समोर दुमडत होते
बँकेतले हिशोब हरिणाच्या गतीने बागडत होते
सारे काही घडत होते..हवे तसे
पण एके दिवशी,आमचे दुर्दैव
उत्तर दरवाज्याजवळ अडवलेला एक भणंग महारोगी
तारस्वरात ओरडला, ‘बाप्पाजी बाहेर या’
आणि काकड आरतीला आम्ही पहातो तर काय ?
गाभारा रिकामा
पोलिसांत वर्दी,आम्ही दिलीच आहे
परत ? कदाचित येईलही तो
पण महारोग्याच्या वस्तीत,तो राहिला असेल तर त्याला पुन्हा
प्रवेश द्यावा की नाही ? याचा विचार करावा लागेल
आमच्या ट्रस्टींना..
पत्रव्यवहार चालू आहे..दुसऱ्या मूर्तीसाठी
पण तूर्त गाभाऱ्याचे दर्शन घ्या
तसे म्हटले तर,गाभाऱ्याचे महत्व अंतिम असतं
कारण गाभारा सलामत तर देव पचास



....सातवा....

चमच्यांच्या स्टँडवर सात चमचे होते
एक चमचा एक दिवशी गहाळ झाला

उरलेल्या सहांच्या गळ्यातून प्रथमच अनावर हुंदका फुटला

ती असती तर ते उद्गारले ,‘तो हरवला नसता’

मीही अनावरपणे सातवा चमचा झालो
आणि त्याची रिकामी जागा घेऊन
सहांच्या हुंदक्यात सामील झालो आणि पुटपुटलो

खरं आहे मित्रांनो,ती असती तर मी हरवलो नसतो

रसिकांना नेहमी उत्तमोत्तम आणि नवनवीन काव्य पुरविण्याचा
ई-साहित्य प्रकाशनाचा ध्यास ‘नेटाक्षरी’ जोमाने पार पाडत आहे. दर आठवड्यात
मिळणाऱ्या तुमच्या प्रतिसादांनी आमचा उत्साह द्विगुणीत होतोय, नेटाक्षरी हा साप्ताहिक
अंक सध्या सुमारे ५०००० मराठी रसिकांना विनामूल्य वितरीत केला जातो. त्या
व्यतिरिक्त वेबसाईट्वर व्हिजिट करुन वाचणाऱ्यांची संख्या लक्षणीय आहे.’
हा अंक आपण आपल्या ईष्टमित्रांना फॉरवर्ड करण्यास आमची काही हरकत नाही परंतु
असे करताना आमच्या आयडीचा अंतर्भाव केल्यास आम्ही आभारी राहू. मराठी
कवितेची लोकप्रियता वाढवण्यास आपला हातभार लाभावा हीच इच्छा.
आपल्यासारख्या रसिकांच्या सहाय्याने हा अंक लवकरच एक लक्ष वाचकांपर्यंत
नियमित पोहचवण्याचा आमचा संकल्प सिध्दीस जाईल असा आम्हाला विश्वास आहे.

हा विनामूल्य अंक नियमित मिळण्यासाठी तसेच सूचना,अभिप्राय,प्रतिक्रियांसाठी.. netaksharee@gmail.com